ePaper

| वर्ष - 6 । अंक - 189 | UDYAM-MH-26-0158827 |

# मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात 18 हजार कोटीचे प्रकल्प



महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 21 ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बाळासाहेबांची शिवसेना-भाजपा महापालिका निवडणुकीत 'महायुती'!

## खासदार श्रीरंग बारणे यांची घोषणा : 'महाईन्यूज'च्या वृत्ताला दुजोरा

।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप एकत्रित लढविणार आहे. त्याबाबतचे सुतोवाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत झालेल्या जिल्ह्यातील दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या बैठकीत केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच्या बैठकीत त्यावर अंतिम शिक्कामोर्तब होईल, असे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. त्याचबरोबर पुणे जिल्ह्यातील विकास कामांना गती दिली जाणार आहे. जिल्ह्यातील विकास कामांचा 'सीएम', 'डीसीएम' दरमहा आढावा घेणार असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.**



दरम्यान, 'महाईन्यूज' ने कालच भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना 'महायुती' सह भाजपाचे आमदार महेश लांडगे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या एकोप्याने महायुतीची ताकद वाढल्याबाबत वृत्त प्रसिद्ध केले आहे. या वृत्ताला दुजोरा देत खासदार बारणे यांनी अधिकृतपणे भाजपा आणि बाळासाहेबांची शिवसेना अशी महापालिकेत 'महायुती' होणार, अशी माहिती प्रसारमाध्यमांना दिली.पुणे जिल्हा, पुणे, पिंपरी-चिंचवड शहराच्या नियोजित विकासाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत वर्षा या शासकीय निवासस्थानी शिवसेना व भाजपची महत्वपूर्ण बैठक मंगळवारी (दि.18) पार पडली. या बैठकीस बाळासाहेबांची शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी खासदार शिवाजीराव आढळराव,

(पान 2 वर)



लांडगे, जगताप अन् बारणेंची 'महायुती'!

महापालिकेत मिळवणार का सत्ता एकहाती?



"पुणे जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा घेण्यासाठी दिवाळीनंतर उपमुख्यमंत्री फडणवीस आणि जिल्ह्यातील दोन्ही पक्षाचे नेते यांच्यासोबत आणखी एक बैठक घेतली जाईल. लोकप्रतिनीधींच्या मागण्यांवर कार्यवाही केली जाईल. विकासात्मक कामांच्या संदर्भात बैठकीत चर्चा केली जाईल. त्यात रखडलेल्या कामांबाबत मार्ग काढण्यात येईल. जिल्ह्याच्या विकासाला गती दिली जाणार आहे. दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी विकासकामे वेगात होण्यासाठी लक्ष ठेवून रहावे. स्थानिक नेत्यांनी समन्वय ठेवून काम करावे".

**-एकनाथ शिंदे**, मुख्यमंत्री.

# मनपा विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देणार !

## माजी नगरसेवक शंकर जगताप : सौर ई बाईक निर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतूक

। पिंपरी । । महाईन्यूज ।

महापालिका शाळांमध्ये शिकणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती आहे. त्याला ई-बाईकची निर्मिती करणाऱ्या या विद्यार्थ्यांमुळे आणखी बळ मिळेल. तसेच, या विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी सर्व प्रकारची मदत करण्याची भूमिका भारतीय जनता पार्टीची राहणार आहे, असे आश्वासन माजी नगरसेवक तथा चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांनी दिले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील माध्यमिक विद्यालयातील नववी व दहावीच्या ऑटोमोमोबाईल ट्रेडच्या विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेवर चालणाऱ्या दोन इलेक्ट्रिकल दुचाकींची (ई-बाईक) निर्मिती केली आहे. भाजपचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख व माजी नगरसेवक शंकर जगताप यांनी गुरूवारी (दि. २०) शाळेत जाऊन या ई-बाईकची पाहणी केली आणि निर्मितीची संपूर्ण माहिती जाणून घेतली. त्याची निर्मिती करणारे विद्यार्थी हणमंत सुरवसे, राधिका पुजारी, आशुतोष काळे, मयुरी वाघमारे यांचा आणि त्यांना मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक संतोष शेंडगे यांचा शकंर जगताप यांनी सत्कार केला. यावेळी मुख्याध्यापक चंद्रशेखर कदम, शिक्षक ए. व्ही. फुगे, के. एस. टकले, एस. ए. दुर्वे, सायली गोरक्ष, मनिषा पवार, माजी नगरसेवक अभिषेक बारणे, सिद्धेश्वर बारणे, संदीप गाडे, सामाजिक कार्यकर्ते काळूराम बारणे, तानाजी बारणे, सनी बारणे आदी उपस्थित होते.



### शंकर जगताप यांनी मारली ई-बाईकची राईड...

विशेष म्हणजे, शंकर जगताप यांनी ई-बाईक चालवून पाहिली. महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या या संशोधनवृत्तीचे त्यांनी कौतुक केले. हणमंत सुरवसे, राधिका पुजारी, आशुतोष काळे, मयुरी वाघमारे या विद्यार्थ्यांचा त्यांनी सत्कार करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. तसेच प्रशिक्षक संतोष शेंडगे यांचाही त्यांनी सत्कार केला.आला नाही. त्यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांनी आत्मचिंतन करावे.

# ऐन सणासुदीत नऱ्हेतील 50 कुटुंबे अंधारात?

## बंद मीटरची बाकी तब्बल साडेआठ लाख : महावितरण अधिकाऱ्यांची चालढकल

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

महावितरणची बाकी थकवून बिल्डरने पोबारा केल्याने फ्लॅट धारकांना किमान साडे आठ लाख रुपयांचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली असून, याबाबत महावितरणचे अधिकारी देखील उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने ऐन सणासुदीत या तब्बल ५० फ्लॅटधारकांना अंधारात राहावे लागण्याची शक्यता आहे.

सन २०१५ साली नऱ्हे गावातील एका इमारतीचे काम सुरू झाले. त्यावेळी महावितरणने बांधकामासाठी



लागणारा मीटर वितरीत केला. मात्र, इमारतीचे काम सुरू असताना तब्बल दीड वर्ष सर्व गोष्टी व्यवस्थित सुरू होत्या मात्र, विकासकाकडून सुमारे दोन महिन्याचे वीजबिल थकाविल्या गेले. त्यानंतर सदर इमारतीमध्ये फ्लॅट विकत घेतलेल्या नागरिकांनी त्या बिलाची भरपाई केली. व त्याचवेळी बांधकामाचे मीटर काढून घरगुती मीटर लावण्यासाठी अर्ज करण्यात आला. मात्र, महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ५० फ्लॅट पैकी केवळ १० मीटर लावून

> येत्या १० नोव्हेंबरपर्यंत या संदर्भात मार्ग काढण्यासाठी आम्ही सकारात्मक प्रयत्न करत आहोत. आम्हाला देखील नियमानुसारच काम करावे लागते. :
> - **मनोजकुमार सूर्यवंशी,** अपिलीय अधिकारी, पर्वती महावितरण केंद्र, सिंहगड रोड.

दिले. त्यानंतर देखील बांधकाम मीटर सुरूच ठेवले.दिवाळखोर झाल्याने विकासक पळून गेला. त्यानंतर सन २०१९ साली पुन्हा सुमारे दीड लाखांच्या आसपास वीज बील येथील नागरिकांनी वर्गणीद्वारे भरले. मात्र, त्यानंतर आलेले बील भरण्यास असमर्थता दर्शविली. त्यानंतर महावितरणने मीटर काढून नेला. सन २०१९च्या सुधारीत शासन निर्णयानुसार बांधकाम व व्यवसायिक मीटर यांच्यातील मीटरभाडे फरक देखील आकारून तब्बल ८ लाख ८६ हजार रुपयांची थकबाकी चढविण्यात आली.

याबाबतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस भूपेंद्र मोरे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत चालढकल करण्याचा प्रयत्न अधिकाऱ्याकडून करण्यात येत आहे. तीन महिन्यापासून फॉलोअप घेणाऱ्या भूपेंद्र मोरे यांच्या वतीने महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. मात्र, यावेळी पोलीसांनी हस्तक्षेप करून आंदोलक व अधिकाऱ्यांना एकाच मंचावर आणले. यावेळी भूपेंद्र मोरे म्हणाले, ऐन सणासुदीच्या दिवसात या नागरिकांना अंधारात राहावे लागणार आहे. या विषयावर सातत्याने फॉलोअप करून देखील अधिकारी नुसत्याच तांत्रिक बाबी पुढे करत आहेत. यामुळे दोष नसताना देखील या फ्लॅटधारकांना विजेसाठी अधिकाऱ्यांचे पाय धरावे लागत आहेत.

## दस्त नोंदणी कार्यालयांतील असुविधांमुळे नागरिक हैराण

।पुणे। महाईन्यूज ।

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मालमत्ता खरेदी-विक्री करण्यासाठी पुणेकरांची दुय्यम निबंधक कार्यालयांत दस्त नोंदणीसाठी गर्दी होत आहे. मात्र, शहरातील अपवाद वगळता बहुतांश कार्यालयांत दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी जागा नाही, पिण्याचे पाणी, चांगली स्वच्छतागृहे नाहीत. तसेच अनेक दुय्यम निबंधक कार्यालयांत दुय्यम निबंधक सुट्या घेतात, पर्यायी मनुष्यबळ नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे उपलब्ध नाही. या असुविधांमुळे दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. वस्तू व सेवा



करानंतर राज्याला सर्वाधिक महसूल मिळवून देणारा विभाग अशी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाची ओळख आहे. राज्याच्या तिजोरीत पुणे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात महसूल जातो. मात्र, शहरातील अपवाद वगळता बहुतांश कार्यालयांत दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांना पिण्याचे पाणी, चांगली स्वच्छतागृहे, बसण्यासाठी जागा अशा सुविधा नाहीत.

याबाबत बोलताना असोसिएशन ऑफ रियल इस्टेट एजंटस संघटनेचे अध्यक्ष सचिन शिंगवी म्हणाले, की शहरातील काही दस्त नोंदणी कार्यालयांतील दुय्यम निबंधक सुट्या घेतात अतिरिक्त दुय्यम निबंधक उपलब्ध नसल्याचे असे सहजिल्हा निबंधकांकडून सांगितले जाते.

शहरातील २८ दस्त नोंदणी कार्यालयांपैकी काही कार्यालये वगळता सारखीच परिस्थिती आहे. राज्याला महसूल भरणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी जागा नाही, स्वच्छतागृहांची व्यवस्था नाही. त्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. आतापर्यंत नोंदणी महानिरीक्षक, सहजिल्हा निबंधक यांच्याकडे वेळोवेळी लेखी तक्रार करूनही फरक पडलेला नाही.

## बाळासाहेबांची शिवसेना-भाजपा महापालिका निवडणुकीत 'महायुती'!

पान 1 वरून

।पुणे। महाईन्यूज ।

माजी राज्यमंत्री विजय शिवतरे, बाळा भेगडे, आमदार महेश लांडगे, राहूल कुल, शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश कोंडे, पुणे महापालिकेचे माजी सभागृह नेते गणेश बिडकर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसोबत एकत्रित बैठक होणार होती. परंतु, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीत असल्याने मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली.

याबाबतची माहिती देताना खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, "पुणे जिल्हा, पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका आणि विकास कामांबाबत बैठकीत महत्वपूर्ण चर्चा झाली. राज्यात बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजपचे सरकार आल्यानंतर विकासाला अधिक गती मिळाली आहे. पुणे जिल्ह्यात कायमच राष्ट्रवादीचे प्राबल्य राहिले. परंतु, राज्य सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यातील बारामतीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. त्या तुलनेत जिल्हा, पुणे, पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाकडे पवारांचे लक्ष राहिले नाही. त्यामुळेच नागरिकांनी सन 2017 मध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेची सत्ता भाजपकडे दिली होती. आता राज्यात युतीचे सरकार आले आहे. राज्य सरकारच्या जास्तीत-जास्त योजना, निधी महापालिका क्षेत्र आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला मिळावा. त्यादृष्टीने या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. पुणे जिल्ह्यातील शिवसेना आणि भाजप नेत्यांच्या समन्वयासाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासोबत पूर्वी एक बैठक झाली होती. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेवून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे धोरण ठरविले जाईल", असेही त्यांनी सांगितले.

### जिल्ह्यातील विकास कामांचा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री दरहमहा आढावा घेणार

पुणे जिल्ह्यात प्रशासकीय अधिका-यांची नियुक्ती करताना दोन्ही पक्षाच्या प्रमुख नेत्यांना विश्वासात घ्यावे. त्यांना विश्वासात घेवूनच अधिका-यांची नियुक्ती करावी. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी जिल्ह्यातील दोन्ही पक्षाच्या नेत्यांसह दरमहा विकासकामांबाबत आढावा बैठक घेण्याचे निश्चित झाले. त्यामुळे जिल्ह्यातील विकासाला चालना मिळणार आहे. दोन्ही पक्षाच्या समन्वयासाठी भाजपचा एक आणि शिवसेनेच्या एका पदाधिका-यांची नियुक्ती केली जाणार आहे. हे दोघे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी संवाद ठेवून आढावा घेत राहतील. त्यामुळे वेगाने विकास कामे मार्गी लागतील. दोन्ही पक्षाच्या नेत्यांमध्ये एकोपा राहिल.

## गर्दीच्या ठिकाणी अवजड वाहनांना बंदी घाला

### महापालिकेचा वाहतूक विभागाला प्रस्ताव

। पिंपरी । । महाईन्यूज ।

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी शहरात अवजड वाहनांना अटकाव करावा आणि बस, रिक्षा यांना योग्य त्या ठिकाणी थांबविण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून वाहतूक पोलिसांना दिला आहे. प्रस्तावात केलेल्या मागणीनुसार योग्य ती कार्यवाही तातडीने करावी, अशी मागणी महापालिकेकडून करण्यात आली आहे.. शहरात गेल्या काही दिवसांपासून बहुतांश भागात वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच सोमवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीनंतर शहरात पूरपरिस्थिती निर्माण झाली. पावसामुळे शहरातील वाहतूक कोंडीतही भर पडली. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनावर टीका सुरू झाली आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी फोडण्यासंदर्भात महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त सचिन इथापे यांनी वाहतूक विभागाचे उप आयुक्तांना तसा प्रस्ताव दिला आहे. त्याबाबतचे पत्र महापालिकेकडून वाहतूक पोलिसांना पाठविण्यात आले आहे. अवजड वाहनांमुळेच वाहतूक कोंडी होत आहे, असा दावा महापालिका प्रशासनाकडून या पत्रात करण्यात आला आहे.




शहरामध्ये गर्दीच्या ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. गर्दीच्या ठिकाणी अवजड वाहतुकीस बंदी आहे. मात्र त्यानंतरही अवजड वाहने शहरात येत आहेत. तसेच बस, रिक्षा त्यांच्या थांब्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी थांबत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे.

# ‘सारथी’कडे दुर्लक्ष केल्यास ‘दणका’!

## शेखर सिंह यांचा इशारा : 15 दिवसांत तक्रारी निकालात काढा






**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

नागरिकांना तक्रारी मांडण्याचे हक्काचे व्यासपीठ असलेल्या सारथी हेल्पलाइनवर प्राप्त झालेल्या तक्रारींकडे महापालिकेचे काही अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे. त्या तक्रारींवर १५ दिवसांत कार्यवाही न झाल्यास संबंधित विभागप्रमुखांवर कारवाई करण्याचा इशारा आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे.

तत्कालीन आयुक्त श्रीकर परदेशी यांनी नागरिकांसाठी सारथी हेल्पलाइन योजना सुरू केली होती. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. या योजनेचे राज्यभरात कौतुक झाले. त्यांची बदली झाल्यानंतर ती योजना रडतखडत सुरू आहे. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी अचानक सारथीवरील तक्रारींचा आढावा घेतचार ते पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांना दंड ठोठावला होता. त्यानंतर तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करून त्या निरस्त केल्या जात होत्या. मात्र, पुढे काही महिन्यांत ती कार्यवाही पुन्हा थंडावली. तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांच्या काळात सारथी हेल्पलाइन पूर्णपणे दुर्लक्षित केले गेले. तसेच महापालिकेतील सारथीचा कक्ष निगडी येथील कमांड अॅण्ड कंट्रोल सेंटर येथे हलविण्यात आला. त्यामुळे कक्षाचा मुख्यालयाशी संपर्क तुटला.

मात्र, नवे आयुक्त सिंह हे सारथीबाबत अधिक जागृत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांनी त्यासंदर्भात आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दात सूचना केल्या आहेत. सारथीच्या तक्रारी व त्यावर झालेल्या कार्यवाहीवर ते स्थायी समितीच्या पहिल्या व तिसऱ्या सभेत आढावा घेणार आहेत. काही विभागांच्या तक्रारी तब्बल ५० ते ५५ दिवसांपर्यंत प्रलंबित असल्याचे दिसून आले आहे. तर, काही तक्रारींवर कार्यवाही न करताच त्या क्लोज करण्यात आल्या आहेत. त्याबाबत त्यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे.

### प्रशासनाची कार्यवाहीसाठी धावपळ...

**महिन्यातून दोन वेळा आढावा घेणार सारथीवरील तक्रार १५ दिवसांच्या कार्यवाही करून त्या निरस्त कराव्यात. तसे न केल्यास संबंधित विभागप्रमुखांवर कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे. तसेच, ते स्थायी समिती सभेत महिन्यातून दोन वेळा आढावा घेणार आहेत. त्यामुळे सर्वच विभागप्रमुख सतर्क झाले असून, तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे.**

### कार्यवाहीची जबाबदारी 55 अधिकाऱ्यांवर...

**हेल्पलाइन सुटसुटीत करण्याचे प्रयत्न महापालिकेच्यासंदर्भात सारथीवर प्राप्त झालेल्या तक्रारींवर कारवाई करण्यासाठी तब्बल १३५ विभागप्रमुखांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. ही संख्या मोठी असल्याने कार्यवाहीस नाहक अधिक वेळ वाया जात होता. विभागाची संख्या आता ५५ वर आणण्यात आली आहे. संबंधित तक्रार थेट विभागप्रमुखांकडे पाठविली जात आहे. त्यामुळे ते योग्य त्या अधिकाऱ्यांकडे संबंधित तक्रार पाठवून त्यावर कार्यवाहीच्या सूचना करू शकतील. त्यामुळे कार्यवाहीत जाणारा वेळ वाचणार आहे. तसेच, तक्रार करण्यासाठी दीड मिनिटाचा वेळ पाच मिनिटे करण्यात आला आहे. ही प्रणाली नागरिक व अधिकाऱ्यांच्या बाजूने अधिक सुटसुटीत करण्यासाठी नवनवीन कल्पनांची जोड देण्यात येत आहे, असे सूत्रांनी सांगितले. सारथी हेल्पलाइनचा क्रमांक ८८८८००६६६६ हा आहे. त्यावर नागरिक आठवड्यातील सात दिवस २४ तास तक्रार करू शकतात.**

# ‘एएसजी’ नेत्र रुग्णालयातर्फे स्वच्छता अभियान रॅली

## विधायक उपक्रम : कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

एएसजी नेत्र रुग्णालय स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एकाच वेळी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पिंपरी-चिंचवडमध्ये पिंपळे सौदागर येथील कोकणे चौकापासून सुरुवात होऊन कुंजीर चौक, कुणाल आयकॉन रोड, शिवार गार्डन ते पुन्हा कोकणे चौक असा स्वच्छता रॅलीचा मार्ग होता. रॅलीच्या मार्गावरिल कचरा सर्व नागरिकांनी गोळा केला. तसेच स्वच्छतेबाबतची जाणीव करण्याबरोबरच व कचऱ्याचे वर्गीकरण याबद्दल या अभियानाद्वारे माहिती देण्यात आली.

स्वच्छता रॅलीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या चिंचवड विधानसभा-अध्यक्षा कुंदाताई संजय भिसे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चिंचवड विधानसभा उपाध्यक्ष नितीन सोनवणे, सर्वस्पर्शी फौंडेशन, संस्थापक अध्यक्ष डॉ. राजू पोखर्णीकर, हास्य क्लबचे राजेंद्र जैस्वाल, सर्वस्पर्शी फौंडेशनचे कार्याध्यक्ष अॅड. आशुतोष रानडे, उन्नत्ती फौंडेशनचे संस्थापक संजय भिसे, रुग्णालयाचे सर्व कर्मचारी, महानगरपालिकेचे अधिकारी,



कर्मचारी आणि विविध सामाजिक संस्था युवावर्गासह पुणेकर नागरिक मोठ्याप्रमाणात सहभागी झाले होते. रॅलीत सहभागी सर्वांनी स्वच्छतेचे कर्तव्य पार पाडण्याची शपथ घेतली. रॅलीत आलेल्या सर्व पाहुण्यांचे रुग्णालय समुहातर्फे स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

देशातील १९ राज्ये आणि ४० शहरांमध्ये विस्तारलेल्या एएसजी नेत्र रुग्णालयाच्या सर्व रुग्णालयांनी या जनजागृती रॅलीचे आयोजन केलेले. एएसजी समुहाने नेहमीच सामान्य लोकांप्रती पूर्ण संवेदनशीलतेने काम केले आहे आणि वेळोवेळी देशभरात विविध जनजागृती मोहिमांद्वारे समाजाला प्रेरणा देण्याचा आणि जागरूक करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संपादकीय

# काँग्रेसची नवी वाट

***गांधी कुटुंबाच्या बाहेरचा नेता अध्यक्ष झाला, याचा अर्थ या कुटुंबाचा प्रभाव संपला, असे नाही. मतदानाच्या टक्केवारीवरूनही हे लक्षात यावे. मात्र, यापुढे सोनिया, राहुल किंवा प्रियांका गांधी यांना 'काँग्रेस अध्यक्ष हाच आमचा नेता' असे जाहीरपणे बोलावे-वागावे लागेल. त्यांच्या निर्णयांचा आदर करावा लागेल आणि त्यांना दैनंदिन किंवा इतरही कामात पुरेसे स्वातंत्र्य द्यावे लागेल.***

काँग्रेसची स्थापना २८ डिसेंबर, १८८५ रोजी मुंबईतल्या गोकुळदास तेजपाल संस्कृत महाविद्यालयात झाली; तेव्हा या पक्षाचे ७२ संस्थापक प्रतिनिधी होते. १३७ वर्षांचा प्रदीर्घ इतिहास व आधुनिक भारताच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा असणारा हा पक्ष काही वर्षे नेतृत्वहीन झाला होता. सन २०१९ मधील पराभवानंतर राहुल गांधी यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. मल्लिकार्जुन खरगे यांच्या रूपाने नवा अध्यक्ष मिळतो आहे; तेव्हा पुढच्या सार्वत्रिक निवडणुकांना केवळ १८ महिने उरले आहेत. काँग्रेसच्या एकेकाळी बालेकिल्ला असणाऱ्या खरगे यांच्या गृहराज्यातील-कर्नाटकातील विधानसभेची निवडणूक तर ११-१२ महिन्यांतच होईल. एस. निजलिंगप्पा यांच्या नंतर कर्नाटकाला स्वातंत्र्योत्तर काळात दुसऱ्यांदा हे अध्यक्षपद मिळाले असले निजलिंगप्पा किंवा नंतर खरगे यांचे महत्त्वाकांक्षी राजकीय गुरू देवराज अर्स यांना इंदिरा गांधी यांनी पुरते निष्प्रभ केले होते. खरगे हे कधीच विसरणार नाहीत. ते स्वत:ही शरद पवार यांच्या पहिल्या बंडाच्या आगे-मागे देवराज अर्स यांच्यासोबत बंड करून १९८० नंतर पुन्हा इंदिरा काँग्रेसवासी झाले होते. आता त्यांना मिळालेले अध्यक्षपद ते कितपत स्वतंत्र बुद्धीने चालवतात, यावर काँग्रेसचे भवितव्य ठरणार आहे. जिद्दीने अध्यक्षीय निवडणूक लढवून हजारावर मते घेणाऱ्या शशी थरूर यांनी 'ही काँग्रेसच्या नवसर्जनाची सुरुवात आहे,' असे म्हटले आहे. हा आशावाद फळावा, असेच लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या कुणालाही वाटेल. मात्र, डॉ. मनमोहन सिंग यांच्या दहा वर्षांच्या यशस्वी काळातही सरकार चालविताना अनेक प्रकारचे हस्तक्षेप झाले. काही प्रसंगी स्वत: सिंग यांनी राजीनामा देईपर्यंत पाळी आली. राहुल गांधी यांनी जाहीरपणे केंद्र सरकारने मांडलेले विधेयक फाडून टाकले. नव्या अध्यक्षांचा असा अपमान व तेजोभंग होणार नाही, याची काळजी घेण्याची मुख्य जबाबदारी आता गांधी कुटुंबावर आहे.

# शाळा वाचवा; मुले शिकवा




गेले काही दिवस कमी पटसंख्येच्या शाळा सरकार बंद करणार अशा बातम्या येत आहे. हा सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा विषय आहे. पण तो इतर गदारोळात दुर्लक्षित राहतो आहे. तीन डिसेंबर २०१७ रोजी तेव्हाचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या चार हजार ९३ प्राथमिक शाळा बंद होणार असल्याचे जाहीर केले. या शाळांतील मुले अन्य शाळांमध्ये जाणार होती. तोच निर्णय आताचे सरकार अमलात आणते आहे. यात अनेक शाळा व विद्यार्थी दुर्गम व मागास पाडे, वस्त्यांवरील आहेत. त्यामुळे, या विद्यार्थ्यांची पुन्हा गळती व ती शाळाबाह्य होण्याची शक्यता आहे. अशा शाळांमधील विद्यार्थी आणि पालक धास्तावले असून आमची शाळा बंद करू नका, अशी हाक विद्यार्थी व पालक तसेच ६५ विविध संघटना व शिक्षणतज्ज्ञ देत आहेत. नुकतीच इगतपुरीजवळ दरेवाडी येथे एका शाळेतील ४० शालेय विद्यार्थी दप्तरे घेऊन रस्त्यावर बसली आणि त्यांनी सरकारला 'आमची वह्यापुस्तके घ्या आणि आम्हाला शेळ्या द्या. त्यांना चारून आम्ही पोट भरू', असे सांगत निदर्शने केली. खरे म्हणजे, शिक्षण जितके तळागाळात पोहोचेल; तितकी विकासाची प्रकिया बळकट होते, पण इथे सरकारच्या या धोरणात सरकारी शाळांमध्ये गरिबांची, श्रमिकांची, सामाजिकदृष्ट्या पिछाडीस असलेल्या समाजातील मुले पोळून निघतात. अशा निर्णयातून सरकार तसेच धोरणकर्त्यांची बेदरकार भूमिका दिसते.

वास्तविक, शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, यासंदर्भात यापूर्वी अनेक व्यासपीठांवर अनेक चर्चासत्रे सन २००९ पासून झाली. त्यात शासन व शिक्षण खात्यातील मान्यवर आणि मोठमोठ्या स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या. आजवर अनेक संशोधनातून हे अनेकदा समोर आले की वंचित व कमकुवत गटांतील मुलांना शाळेत नेणे हे व्यवस्थेसमोरचे मोठे आव्हान आहे. या मुलांमध्ये दलित, आदिवासी, अल्पसंख्याक मुले व विशेषतः मुली आहेत.



त्यांच्या शिक्षणाचे आव्हान पेलण्यासाठी खरेतर शाळाच त्यांच्यापर्यंत नेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकारच्या 'बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११' या राजपत्रानुसार सर्व बालकांना मोफत शिक्षण मिळवण्याचा अधिकार आहे. याच कायद्याच्या भाग तीन कलाम सहा-क नुसार 'इयत्ता पहिली ते पाचवी यात शिकणाऱ्या बालकांबाबत वस्तीनजीक एक किलोमीटर या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत आणि ६ ते ११ वर्षे वयोगटातील किमान वीस बालके असतील, तेथे शाळा सुरू केली जाईल,' असे म्हटले आहे. शिवाय, याच कायद्याच्या क्रमांक ३.२ नुसार 'डोंगराळ क्षेत्रात किंवा दुर्गम क्षेत्रांत राज्य शासनास पोट नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान अंतरात यथायोग्य बदल करता येईल, असेही म्हटले आहे. यातून या कायद्यातील घरापासून शाळेचे अंतर आणि अन्य गोष्टींमध्ये सकारात्मक लवचिकतेला जागा आहे. हीच लवचिकता पटसंख्येबाबत हवी. यानंतर या कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी कृतिकार्यक्रम बनवण्यासाठी अनेक संयुक्त कार्यशाळा शिक्षण खात्याने घेतल्या. आणि असे असूनही आता हे सर्व उफराटे निर्णय सरकार का घेते आहे? ज्या दुर्गम भागात मोठ्या प्रयत्नांनी शाळा सुरू झाल्या होत्या; त्यांचा दर्जा व पटसंख्या सुधारण्याचे कार्यक्रम हाती घेण्याऐवजी कमी पटसंख्येचे कारण दाखवून मुलामुलींना दूरच्या शाळांमध्ये दाखल करण्याचे निर्णय घेतले जात आहेत. हे खरोखर भयंकर आहे. यामुळे बरीचशी मुले शाळेबाहेर फेकली जाणार हे उघड आहे. वयाने लहान असलेल्या बालकांना एक ते दीड किलोमीटर लांब असलेल्या शाळेत स्वतः जाणे अथवा गरीब, श्रमिक किंवा हातावर पोट असणाऱ्या पालकांना मुलांना शाळेत नेणे व आणणे शक्य तरी होईल का? हे कसले सरकार आहे जे पैसे नसल्याचे कारण सांगून असे निर्णय घेते आहे? दुसरीकडे बुलेट ट्रेन, हायपरलूप, मेट्रो, समृद्धी महामार्ग यांच्यासारखे प्रकल्प प्राधान्यक्रमात कोट्यवधी रुपये खर्चून अंमलात आणताना पैसा कमी पडत नाही.

# आदिवासी कल्याणासाठी अनुसूचित क्षेत्रांची पुनर्रचना हवी

**राज्यात जाहीर झालेल्या अनुसूचित क्षेत्राची कागदोपत्री रचना सदोष असल्याने शेकडो गावांतील आदिवासी कायद्याने मिळणाऱ्या हक्काच्या लाभांपासून वंचित आहेत. हे चित्र बदलण्यासाठी अनुसूचित क्षेत्राची फेरपडताळणी होऊन त्यानुसार तातडीने त्यांची फेररचना व्हावी...**

आदिवासींच्या कल्याणासाठी, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यघटनेत अनेक तरतुदी आहेत. सन २०११च्या जनगणनेनुसार राज्यातील ३६ जिल्ह्यांतील ४४ हजार १९९ गावे व शहरांमधील ११ कोटी २३ लाख या एकूण लोकसंख्येपैकी एक कोटी पाच लाख आदिवासी लोकसंख्या (९.३५ टक्के) आहे. राज्यातील ३१ हजार ६३९ गावे-शहरांपैकी पावणेसात हजार गावे व शहरांत ५० टक्क्यांहून अधिक आदिवासी लोकसंख्या आहे. राज्यात सर्वप्रथम १९५० मध्ये अनुसूचित क्षेत्र जाहीर झाले. त्यानंतर केंद्र सरकारच्या १९८५ च्या राजपत्रात राज्यातील पाच हजार ३८८ गावांना अनुसूचित क्षेत्राचा दर्जा देण्यात आला. १३ जिल्ह्यांतील २३ तालुके संपूर्ण व ३६ तालुके अंशतः अनुसूचित क्षेत्रात असून यातील महसूली गावांची संख्या २०११च्या जनगणनेनुसार पावणेसहा हजार आहे. १९९० मध्ये राज्याने गावांना अनुसूचित क्षेत्राचा दर्जा दिला. लोकसंख्येतील आदिवासींचे प्राबल्य, एकत्रित क्षेत्र आणि



वाजवी आकार, क्षेत्राचे तुलनेने अविकसित स्वरूप आणि लोकांच्या आर्थिक मानकांमध्ये असमानता, या केंद्राच्या मार्गदर्शक तत्त्वांचा यासाठी आधार होता.

अनुसूचित क्षेत्र मुख्यतः ग्रामीण भागात आहे. तेथील विकासासाठी केंद्राने १९९६मध्ये 'पंचायत (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत) कायदा' (पेसा) लागू केला. अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी जमातींकडे अधिक अधिकार जातील, अशी त्यावेळी कल्पना होती. हा कायदा २०१४मध्ये महाराष्ट्रात लागू झाला. आदिवासी भागात पंचायती राज व्यवस्था पारदर्शी, कृतिशील, जबाबदार आणि भ्रष्टाचारमुक्त होईल, हा त्याचा हेतू आहे. या कायद्यान्वये अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना अनेक अधिकार प्रदान केले. त्यांचा प्रत्यक्षात वापर व्हावा, यासाठी अर्थसंकल्पाच्या नियमित योजनांद्वारे आदिवासी विकास विभागाला मिळणाऱ्या तरतुदीच्या पाच टक्के निधी या गावांच्या ग्रामसभांना त्यांच्या गावातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत केला जातो. मात्र, १९७१च्या जणगणनेत वगळलेल्या आदिवासीबहुल क्षेत्राला या कायद्यानुसार मिळणाऱ्या राजकीय, आर्थिक व रोजगार विषयक अशा विविध फायद्यांपासून दीर्घकाळ वंचित ठेवले आहे. हा अन्याय दूर होण्यासाठी अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेची गरज आहे. केंद्राची १९८५मधील अनुसूचित क्षेत्रातील गावे जाहीर झाली, ती अधिसूचना १९७१च्या जनगणनेतील माहितीवर आधारित होती. त्यात, विर्दभातील आदिवासीबहुल गोंदिया, भंडारा, नागपूर या जिल्ह्यांत व वर्धा, अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासीबहुल तालुक्यांत आदिवासींची लोकसंख्याच नसल्याचे दर्शविले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



वळितें जें गाई ।
त्यासि फार लागे काई ॥१॥
निवे भावाच्या उत्तरीं ।
भलते एके धणी वरी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# आरसीएफ थळ दुर्घटनेत आणखी एक मृत्यू

## दुर्घटनेतील मृतांचा आकडा चार वर




**आरसीएफ कंपनीच्या थळ प्रकल्पात स्फोट**

**मृतांच्या वारसांना पाच लाखांची मदत तर जखमींना तीन लाखांची मदत**

**। अलिबाग । महाईन्यूज ।**

आरसीएफ कंपनीच्या थळ प्रकल्पात झालेल्या स्फोट दुर्घटनेतील मृतांची संख्या चारवर पोहोचली आहे. दुर्घटनेतील जखमी साजिद सिद्दीकी याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दरम्यान कंपनी व्यवस्थापनाने मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाखांची तर जखमींना तीन लाखांची तातडीची मदत व उपचार खर्च देण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी संध्याकाळी पाचच्या सुमारास ही दुर्घटना घडली होती. कंपनीच्या बाष्प निर्मिती संयत्र नियंत्रण कक्षात वातानुकूलन यंत्रणा बसविण्याचे काम सुरु होते. यावेळी अचानक स्फोट झाला. या दुर्घटनेत तीन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. तर तीन जण गंभीर जखमी झाले होते. या तिघांना उपचारासाठी नवीमुंबईतील फोर्टीस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यातील साजिद सिद्दीकी यांचा गुरुवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. अन्य दोन जखमींची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

दरम्यान या संपुर्ण दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी उच्चस्तरीय तज्ञ सदस्यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, फॅक्ट्री इंस्पेक्टर, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाच्या सदस्यांनी दुर्घटना स्थळाची पहाणी केली आहे. दुर्घटनेनंतर कंपनीतील सर्व संयत्रांचे प्रचलन सुस्थितीत सुरु आहे अशी माहिती कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक श्रीनिवास कुलकर्णी यांनी दिली आहे.

# भू-विकास' बँकेतील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा निर्णय

## शिंदे-फडणवीस सरकारचा मोठा दिलासा

**।सोलापूर ।महाईन्यूज।**

**धोधो बरसणाऱ्या परतीच्या पावसामुळे राज्यातील दीड लाख हेक्टवरील पिके मातीमोल झाली आहेत. त्यामुळे शेतीवर मोठं संकट उभ राहिले आहे. त्यातच आता सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा दिला आहे. भू-विकास बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्यात येणार आहे. एकूण 964 कोटी 15 लाख रुपयांची ही कर्जमाफी असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**

मंत्रिमंडळ बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री गिरीश महाजन, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री दिपक केसरकर, मंत्री तानाजी सावंत, मंत्री अब्दुल सत्तार यावेळी उपस्थित होते. एकनाथ शिंदे म्हणाले की, "सरकार स्थापन झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतले. वीज दर युनिट कमी करणे, हजारो हेक्टर जमीन ओलीताखाली येण्यासाठीच्या प्रकल्पांना मंजुरी, समुद्रात वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागात वळवण्याचा निर्णय घेतले आहेत. तसेच, आता परतीच्या पावसाने नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत," असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं.



### मंत्रिमंडळ बैठकीत झालेले निर्णय

- नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इस्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र स्थापन करणार. शासनाला दर्जेदार सल्ला व धोरणात्मक मार्गदर्शन मिळणार (नियोजन विभाग)
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट- ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड पदभरतीसाठी परीक्षा टीसीएस, आयबीपीएस घेणार. या माध्यमातून 75 हजार पदे भरण्याचा मार्ग सुकर. ( सामान्य प्रशासन विभाग)
- ऐच्छिकरित्या वाहनांचे स्क्रॅपिंग करणाऱ्यांना व्याज व दंडमाफ करणार. भंगार स्थितीतील वाहनांचा प्रश्न सुटणार. (परिवहन विभाग)
- 5 जी तंत्रज्ञानासाठी पायाभूत सुविधा वेगाने वाढविण्यासाठी दूरसंचार पायाभूत सुविधा धोरण. (माहिती तंत्रज्ञान विभाग)
- मराठवाडा, विदर्भ,उत्तर महाराष्ट्रात अल्पसंख्याक महिलांचे 2800 बचत गट निर्माण करणार. 1500 महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण. (अल्पसंख्यांक विकास विभाग)
- "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क" संस्थेस अनुदान स्वरुपात निधी देणार. (पणन विभाग)
- राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील 30 जून 2022 पर्यंतचे खटले आता मागे घेणार. (गृह विभाग)
- माहिती तंत्रज्ञान तज्ञ विभागातील राजपत्रित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळणार. (वित्त विभाग)
- बुलडाणा जिल्ह्यातील अरकचेरी आणि आलेवाडी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता. 1918 हेक्टर जमिनीला यामुळे फायदा होणार आहे. (जलसंपदा विभाग)
- राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनीचे भागभांडवल 311 कोटी करणार. (वित्त विभाग)
- महाराष्ट्र आकस्मिकता निधीच्या मर्यादित 200 कोटींची तात्पूरती वाढ करण्याचा निर्णय. (वित्त विभाग)
- 1250 मे टन प्रतिदिन गाळप क्षमता 2500 मे.टन पर्यंत वाढविण्यासाठी शासकीय भागभांडवल देणार. (सहकार विभाग)

# "आयुष्यभर पंतप्रधान बनण्याचे स्वप्न पाहिलं, भविष्यात..."

## बावनकुळेंचा शरद पवारांना खोचक टोला

**। नाशिक । महाईन्यूज ।**



भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना अप्रत्यक्षपणे टोला लगावला आहे. राष्ट्रवादीचे कधीही ५०-५५ पेक्षा आमदार निवडून आले नाही. त्यांनी आजपर्यंत तोड, फोडीचे राजकारण केलं. आयुष्यभर पंतप्रधान बनण्याचे स्वप्न पाहिलं. मात्र, ते कधीही पंतप्रधान बनू शकते नाहीत, भविष्यात होतील की माहिती नाही, असा टोमणा बावनकुळे यांनी शरद पवारांना मारला आहे. ते पुण्यात बोलत होते.

अंधेरी पोटनिवडणुकीत भाजपाने सुरुवातीला मुरजी पटेल यांना उमेदवारी दिली. त्यानंतर निवडणुकीतून माघर घेत असल्याचं जाहीर केलं. त्यावरून ठाकरे गटाकडून भाजपावर टीकास्त्र डागण्यात येत होते. यावरही चंद्रशेखर बावनकुळेंनी प्रतिक्रिया दिली आहे. "शरद पवार जे बोलले, ती स्क्रिप्ट होती का? शरद पवारांनी महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास याचा दाखला दिला. त्यांनी अप्रत्यक्षपणे भाजपाला विनंती केली होती.

राज ठाकरेंनीही विनंती केली होती. शरद पवारांच्या बोलण्यात भाजपानं उमेदवार मागे घेण्याबाबत विचार करण्याचा संदर्भ होता."

# 'पीएफआय'च्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना पनवेलमधून अटक



**पनवेल :** केंद्र सरकारने बंदी घातलेल्या पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेच्या दोन पदाधिकारी आणि काही कार्यकर्त्यांची पनवेल येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. याबाबतची माहिती मिळताच दहशतवाद विरोधी पथकाने संबंधित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना अटक केली.निर्देशानुसार पोलिसांकडून छळवणूक सुरू झाली आहे. या खुनसी कारवाईचा जाब विचारण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आल्याचे ठाकरे समर्थकांकडून सांगण्यात आले.बेलापूर येथील सीएनजी पंपाजवळ असलेल्या मैदानातील सभेनंतर एकत्रितपणे मोर्चाने पोलिस आयुक्तालयाच्या दिशेने निघालेल्या मोर्चाला जुन्या महापालिका मुख्यालयासमोर पोलिसांनी अडवले. त्यानंतर शिष्टमंडळाने पोलीस आयुक्त बिपिनकुमार सिंह यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. केंद्र सरकारने दहशतवादी कारवाया करण्यात येत असल्याचा ठपका ठेवून पीएफआय या संघटनेवर सप्टेंबर २०२२ मध्ये पाच वर्षांसाठी बंदी घातली आहे. मात्र, पीएफआयचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची पनवेल येथे बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती दहशतवाद विरोधी पथकाला मिळाली. पथकाने पीएफआय संघटनेचे पनवेलचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांविरोधात बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा १९६७ चे कलम १० अन्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. तसेच, याप्रकरणी पुढील तपास

# सर्वसामान्यांच्या नाराजीची दखल केव्हा घेणार?

## अशोक चव्हाणांचा राज्य सरकारला सवाल

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

उद्योजकांच्या नाराजीची दखल घेऊन औद्योगिक भूखंडांच्या वितरणावरील स्थगिती राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने रद्द केली. त्याप्रमाणे सर्वसामान्यांची नाराजी व त्यांना सोसाव्या लागणाऱ्या अडचणींची दखल घेत रस्ते, जलसंधारणाची कामे आदींवरील स्थगिती हे सरकार केव्हा मागे घेणार? असा सवाल राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी केला आहे.

राज्यात नवीन सरकार आल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विविध स्तरावर असलेल्या भूखंड वितरणाला स्थगिती दिली होती. या निर्णयामुळे उद्योग क्षेत्रात नाराजीचे वातावरण होते व काही उद्योग राज्याबाहेर जाणार असल्याचीही चर्चा होती. अखेर या नाराजीची दखल घेत काल च राज्य सरकारने सुमारे 183 भूखंडांच्या वाटपावरील स्थगिती मागे घेण्याचा शासन निर्णय



जारी केला. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले की, राज्य सरकारने उद्योजकांच्या नाराजीची दखल घेतली. पण त्याप्रमाणेच सर्वसामान्यांच्या नाराजीची व अडचणींचीही दखल केव्हा घेतली जाणार? हा खरा प्रश्न आहे. नवीन सरकार येताच राज्यभरातील रस्त्यांची कामे, जलसंधारणाची कामे, नगरविकास विभागामार्फत मंजूर झालेली कामे, जिल्हा नियोजन व विकास समितीचे निर्णय आदी सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडीत कामांना सरसकट स्थगिती देण्यात आली होती. यातील अनेक कामे अर्थसंकल्पात प्रस्तावित होऊन विधिमंडळात मंजूर झालेली होती. रस्ते विकासाच्या जवळपास पूर्णत्वास आलेल्या कामांवरही

**राज्यात नवीन सरकार आल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विविध स्तरावर असलेल्या भूखंड वितरणाला स्थगिती दिली होती. या निर्णयामुळे उद्योग क्षेत्रात नाराजीचे वातावरण होते व काही उद्योग राज्याबाहेर जाणार असल्याचीही चर्चा होती. अखेर या नाराजीची दखल घेत कालच राज्य सरकारने सुमारे 183 भूखंडांच्या वाटपावरील स्थगिती मागे घेण्याचा शासन निर्णय जारी केला. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले की, राज्य सरकारने उद्योजकांच्या नाराजीची दखल घेतली. पण त्याप्रमाणेच सर्वसामान्यांच्या नाराजीची व अडचणींचीही दखल केव्हा घेतली जाणार? हा खरा प्रश्न आहे.**

स्थगिती लादण्यात आली होती. पुढील उन्हाळ्यात पाणीटंचाई टळावी, या हेतूने मंजुरी मिळालेल्या जलसंधारणांच्या कामांचा यामध्ये समावेश होता. या कामांवरील स्थगितीचा त्रास सामान्य नागरिकांना सहन करावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने या कामांवरील स्थगितीचा निर्णयही तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी अशोक चव्हाण यांनी केली.

संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निर्णयांना देखील स्थगिती देण्यात आलेली होती. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर अनेक आठवडे बहुतांश जिल्ह्यांना पालकमंत्रीच नव्हते. आता पालकमंत्री जाहीर झाले तरी, अनेक जिल्ह्यांत अजून जिल्हा नियोजन व विकास समितीच्या बैठकाच झालेल्या नाहीत. चालू आर्थिक वर्षातील सात महिने निघून गेले आहेत. वेळेचा असाच अपव्यय होत राहिला तर, जिल्हा नियोजन व विकास समितीचा शेकडो कोटी रुपयांचा निधी शेवटच्या तीन-चार महिन्यांत घाईगडबडीने खर्च करणार का? असाही प्रश्न अशोक चव्हाण यांनी यानिमित्ताने उपस्थित केला आहे

# शरद पवार-आशिष शेलार यांच्या पॅनलचा बोलबाला!

### एमसीए अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अमोल काळे विजयी, संदीप पाटलांचा पराभव

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अमोल काळे यांची वर्णी लागलेली आहे. अध्यक्षपदाच्या या निवडणुकीत संदीप पाटील विरुद्ध अमोल काळे असा सामना रंगला होता. मात्र अमोल काळे यांनी ही अध्यक्षपदाची निवडणूक जिंकली आहे. शरद पवार- आशिष शेलार पॅनलकडून ते उभे होते.



मागील अनेक दिवसांपासून एमसीए अध्यक्षपदाच्या निवडणुकीची चर्चा होती. या निवडणुकीत राजकीय विरोधक असलेले भाजपाचे नेते आशिष शेलार आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे एकत्र आले होते. आज (२० ऑक्टोबर) पार पडलेल्या निवडणुकीत एकूण ३८० मतदार मतदानाचा हक्क बजावणार होते. या निवडणुकीत पवार-शेलार पॅनेलचे उमेदवार अमोल काळे यांचा विजय झाला आहे. शरद पवार यांच्या पॅनलने सुरुवातीला अध्यक्षपदासाठी संदीप पाटील यांना पाठिंबा दिला होता. मात्र, आशिष शेलार यांच्याबरोबर चर्चा झाल्यानंतर शरद पवारांनी निर्णय बदलला. शरद पवार आणि आशिष शेलार पॅनल एकत्र आले. आशिष शेलार बीसीसीआय खजिनदार झाल्याने त्यांच्याजागी अमोल काळे यांना अध्यक्षपदासाठी उमेदवारी देण्यात आली होती.

### कोणाला किती मतं?

**अमोल काळे यांच्या विरोधात निवडणूक लढवणारे संदीप पाटील हे माजी क्रिकेटपटू आहेत. या निवडणुकीत अमोल काळे यांना १८३ मतं मिळाली तर संदीप पाटलांना एकूण १५८ मतं मिळाली. म्हणजेच अमोल काळे यांचा २३ मतांनी विजय झाला आहे. निवडणुकीत ३०० पेक्षा जास्त मतदारांनी मतदान केले होते.**

# मध्य प्रदेशात इमारत कोसळून 3 ठार, 7 जखमी

### फटाक्यांमुळे स्फोट झाल्याचा संशय

।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मध्य प्रदेशातील एका घरात स्फोट होऊन संपूर्ण घर कोसळले आहे. घर कोसळल्याने तीन जणांचा मृत्यू झाला असून, एक बेपत्ता असून सात जण जखमी झाले आहेत. गुरूवारी सकाळी 11.15 वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. या स्फोटाची माहिती मिळताच घटनास्थळी अग्नीशमन दल आणि पोलिसांनी धाव घेत अधिक तपासाला सुरूवात केली. याप्रकरणी अधिक तपास केला असता, घरात फटाके ठेवण्यात आल्याने स्फोट झाल्याचा संशय व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुरैना जिल्ह्यातील बनमोर



शहरातील जैतपूर रस्त्यावरील एका घरात ही घटना घडली. दिवाळीचा सण लक्षात घेऊन घरात फटाके ठेवण्यात आले होते. यामध्ये आग लागल्याने हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनाचे संपूर्ण पथक घटनास्थळी दाखल झाले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी येथे मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू असून त्यासाठी जेसीबी मशिनसह इतर साधनांची मदत घेतली जात आहे.

# वर्षभरात भारतात येणार आर्थिक मंदी

## जगभरातील सीईओंनी व्यक्त केली चिंता

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कोरोनामुळे पुकारलेले लॉकडाऊन (Lockdown) आणि रशिया-युक्रेन यांच्यातील युद्धामुळे (Russia Ukrain War) जागतिक अर्थव्यवस्था कोलमडली आहे. त्यामुळे येत्या वर्षभरात भारतात मंदी (Economic recession) येऊ शकते, असा निष्कर्ष एका संशोधनातून समोर आला समोर आला आहे. केपीएमजीने भारतातील सीईओ आऊटलूकच्या केलेल्या सर्वेक्षणातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या सर्वेक्षणात जगभरातील १३०० हून अधिक सीईओ सहभागी झाले होते. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या



भारतातील ६६ टक्के सीईओंनी पुढील १२ महिन्यांत देशात मंदी येण्याची शक्यता वर्तवली आहे. तर, पुढील वर्षभरात जग जागतिक मंदीच्या कचाट्यात येऊ शकते, असं जगभरातील ८६ टक्के सीईओंनी सांगितलं.

जगभरातील अर्थव्यवस्था कोलमडलेली असली तरी आणि देशात आर्थिक मंदी येणार असली तरीही भारतावर याचा फारसा परिणाम होणार नसल्याचंही या सीईओंनी म्हटलं आहे. कारण सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ५८ टक्के सीईओंनी ही मंदी किरकोळ आणि अल्पकालीन असल्याचंही म्हटलं आहे. तर, मंदीसाठी ५५ टक्के कंपन्यांनी तयारीही केल्याचं म्हटलं आहे.

### मंदीमुळे काय होईल?

पुढील वर्षभरात जागतिक मंदी येणार असली तरीही या मंदीमुळे कंपन्यांच्या कमाईवर १० टक्क्यांपर्यंत परिणाम होणार आहे. तसंच, विकासावरही परिणाम होण्याची शक्यता असल्याचं ७३ टक्के सीईओंनी म्हटलं आहे. तर, ७६ टक्के सीईओंनी मंदीचा सामना करण्याची तयारी केली असल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.पुढील वर्षभरात जागतिक मंदी येणार असली तरीही या मंदीमुळे कंपन्यांच्या कमाईवर १० टक्क्यांपर्यंत परिणाम होणार आहे. तसंच, विकासावरही परिणाम होण्याची शक्यता असल्याचं ७३ टक्के सीईओंनी म्हटलं आहे. तर, ७६ टक्के सीईओंनी मंदीचा सामना करण्याची तयारी केली असल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.

# ऐश्वर्या नारकर जीममध्ये!

मराठी टीव्ही, नाटक आणि चित्रपट माध्यमांमध्ये आपल्या अभिनयाची वेगळी छाप उमटविणाऱ्या अभिनेत्रींमध्ये एका अभिनेत्रीचे नाव आवर्जुन घेतले जाते. त्या म्हणजे ऐश्वर्या नारकर. त्यांनी आपल्या आगळ्या वेगळ्या अभिनय शैलीनं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले. नाटक असो वा जाहिरात, एखादा लघुपट असो किंवा चित्रपट या साऱ्या माध्यमांमध्ये ऐश्वर्या नारकर यांचा प्रभाव कायम राहिला आहे.



सध्या सोशल मीडियावर ऐश्वर्या नारकर यांच्या फिटनेसचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामध्ये त्या जीममध्ये वर्कआऊट करताना दिसत आहे. त्याला नेटकऱ्यांची मोठी पसंती मिळाली आहे. तो व्हिडिओ शेयर करताना ऐश्वर्या यांनी एक कॅप्शन दिली आहे. त्यात त्या म्हणतात, कष्ट केल्याशिवाय काही मिळत नाही. तुमच्या कामात सातत्य ठेवा. यश मिळेल याची खात्री बाळगा. ऐश्वर्या यांच्या त्या व्हिडिओला नेटकऱ्यांची मोठी पसंती मिळाली आहे. अनेकांनी त्यांचे कौतूकही केले आहे. कित्येकांनी ऐश्वर्या यांनी या वयातही दाखवलेल्या उत्साहाचे तोंडभरुन कौतूक केले आहे. नेटकरी ऐश्वर्या यांचा फिटनेस पाहून अवाक झाले आहेत. यापूर्वी देखील ऐश्वर्या यांनी शेयर केलेल्या फोटो आणि व्हिडिओला नेटकऱ्यांनी मनापासून दाद दिली आहे. नारकर या सोशल मीडियावर सक्रिय असणाऱ्या सेलिब्रेटी आहेत. इन्स्टाग्राम या फोटो शेअरिंग ॲपवर ऐश्वर्या त्यांचे फोटो, व्हिडीओ पोस्ट करत असतात. त्यांच्या अभिनयाची, सौंदर्याची, इतकंच काय तर पती अविनाश नारकर यांच्यासोबतच्या त्यांच्या जोडीची अनेकदा चर्चा होते. नाटक, चित्रपट आणि मालिका या तिन्ही क्षेत्रातून आपल्या अभिनयाची आणि सौंदर्याची छाप पाडणाऱ्या अभिनेत्री ऐश्वर्या नारकरांच्या फोटोंना मिळणारा प्रतिसादही मोठा आहे.


# जान्हवी कपूरने खुशीला दिला मोलाचा सल्ला;

जान्हवी कपूर आणि खुशी कपूर दोघीही बॉलीवूडच्या ग्लॅमरस बहिणी आणि आता अभिनेत्री देखील. कपूर कुटुंबाच्या या दोघी लाडक्या मुली आणि लाखो-करोडो चाहत्यांच्याही फेव्हरेट. श्रीदेवी आणि बोनी कपूरच्या या मुली



सध्या इंडस्ट्रीतल्या चर्चेतल्या अभिनेत्री आहेत. जिथे जान्हवी कपूर बॉलीवूडमध्ये आता आपला जम बसवून यशस्वी अभिनेत्रींच्या रांगेत विराजमान झाली आहे तिथे खुशी कपूर नुकतच इंडस्ट्रीत पदार्पण करण्याच्या तयारीत आहे. अशात आता जान्हवीनं आपल्या छोट्या बहिणीला एक सल्ला दिलाय ज्याची जोरदार चर्चा रंगली आहे. जान्हवीनं आपल्या छोट्या बहिणीला काम करत असताना काय-काय करायचं नाही याविषयी काही गोष्टी स्पष्टच सांगितल्या आहेत. जान्हवीनं आपल्या एका मुलाखतीत खुशी कपूरला कोणत्याही अभिनेत्याला डेट न करण्याचा सल्ला दिला आहे. आता तिनं हे असं का सांगितलं ते चला

# “या ठिकाणची लोक फार…”; यामी गौतमने सांगितला मुंबईबद्दलचा अनुभव





यामी मूळची हिमाचल प्रदेशातील आहे, तिने आपल्या करियरची सुरवात मॉडेलिंग क्षेत्रापासून केली आहे. २००८ साली ती मुंबईत दाखल झाली आहे.

बॉलिवूडमध्ये काम करण्यासाठी आज देशभरातून अनेक कलाकार येत असतात. शाहरुख खान ते कंगनापर्यंत, या सर्व मुंबई बाहेरच्या कलाकारांनी आपले स्थान निर्माण केले आहे. विकी डोनर चित्रपटातून तरुणांची क्रश असलेली अभिनेत्री यामी गौतम देखील आपले करियर करण्यासाठी मुंबईत आली आणि आज बॉलिवूडमधील एक प्रसिद्ध अभिनेत्री बनली आहे. एका मुलाखतीत तिने आपल्या मुंबईतील अनुभव सांगितला आहे.

बॉम्बे जर्नी या कार्यक्रमात अनेक बॉलिवूडचे सेलिब्रेटी येत असतात. मुंबईबद्दलचे अनुभव या कार्यक्रमात सांगत असतात. यामी मुंबईबद्दल सांगताना म्हणाली, ‘पहिल्यांदा मुंबईत आले तेव्हाडोक्यात मुंबईबद्दलच्या अनेक कल्पना होत्या, चित्रपटात दाखवल्याप्रमाणे इथे सगळी घरे समुद्रजवळ असतील सगळी घरे आलिशान आणि मोठी असतील मात्र प्रत्यक्षात इथे आल्यावर परिस्थिती वेगळी होती. इथे राहणारी लोक जशा अवस्थेत आहेत तसेच राहतात. इथे सगळे परिस्थितीशी जुळवून घेणारे आहेत. माझी ऑडिशन होती मी आले होते आणि पहिल्याच फेरीत निवडले गेले होते’.

# जान्हवीचा 'लव्ह बाईट' चर्चा तर होणारच!



सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या अनेक बातम्या नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेत असतात. सध्या बॉलीवूडच्या प्रसिद्ध सेलिब्रेटी जान्हवी कपूरच्या बातमीनं नेटकऱ्यांमध्ये चर्चा सुरु झाली आहे. ती बातमी आहे जान्हवीच्या लव बाईटची.... जान्हवी ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या कारणासाठी चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. ती ती बोल्डनेसमुळे चाहत्यांच्या आकर्षणाचा विषय असते. तिला सोशल मीडियावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठा आहे. गेल्या काही दिवसांपासून जान्हवीच्या बोल्ड़ फोटोंनी नेटकऱ्यांना घायाळ करुन टाकले आहे. त्यांनी त्या फोटोंवर भन्नाट प्रतिक्रियाही दिल्या आहेत. सध्या जान्हवीच्या लवबाईटचे फोटो व्हायरल झाले आहेत. त्या फोटोमध्ये जान्हवी ही ब्लॅक कलरच्या फोटोंमध्ये दिसत असून तिनं स्लिवलेस ड्रेस परिधान केला आहे. त्या फोटोंमध्ये जान्हवी कमालीची बोल्ड दिसते आहे. या फोटोमध्ये जान्हवीच्या खांद्याच्या बाजुला एक खूण दिसत आहे. त्यामुळे नेटकऱ्यांनी वेगवेगळे अंदाज वर्तवण्यास सुरुवात केली आहे. ती खूण म्हणजे जान्हवीचा लवबाईट आहे. असे नेटकऱ्यांचे म्हणणे आहे. काही तासांतच त्या पोस्टला साडेचार लाख व्ह्युज मिळाले आगेत. नेटकऱ्यांनी त्या पोस्टवर दिलेल्या प्रतिक्रियाही कमालीच्या बोल्ड आहेत. जान्हवीचा लवबाईट म्हणजे चर्चा तर होणारच... नेटकऱ्यांनी त्या व्हिडिओवर वेगवेगळे इमोजीही शेयर केले आहेत. त्यामुळे तो व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### जागतिक नेमबाज स्पर्धेत सुवर्णपदक पटकवणाऱ्या रुद्राक्ष पाटीलचा गौरव



**। मुंबई । महाईन्यूज**

जागतिक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक पटकविणाऱ्या रुद्राक्ष बाळासाहेब पाटील यास रोख २ कोटी रुपये देण्याचे आज(गुरुवार) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.


राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुद्राक्षचे अभिनंदन केले असून राज्य मंत्रिमंडळानेही त्याच्या अभिनंदनाचा ठराव केला. कैरो येथे झालेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेतील दहा मीटर रायफल्स स्पर्धेत भारताचा नेमबाज रुद्रांक्ष पाटीलने वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं. त्याबद्दल आज बैठकीच्या सुरुवातीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी रुद्रांक्ष पाटीलने केलेल्या कामगिरीची माहिती दिली. २०२४ ला फ्रान्समध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेचा पहिला कोटा त्याला मिळाला आहे. रुद्रांक्ष पाटील याच्या या कामगिरीमुळे त्याचं कौतुक केलं जात आहे. वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी त्याने ही कामगिरी केली आहे.

# भारत पाकिस्तान सामन्यावर निसर्गाचं संकट!

## रद्द झाल्यास लाखो कोटींचा फटका

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**





भारत आणि पाकिस्तानचे संघ २३ ऑक्टोबरला मेलबर्नमध्ये आमनेसामने येणार आहेत. त्याला 'महामुकाबला' असेही म्हटले जात आहे. पण सध्या या महामुकाबल्यावर पावसाचे ढग दाटून आले आहेत. हे दोन संघ नुकतेच आशिया चषकामध्ये आमनेसामने आले होते, त्यानंतर भारताने साखळी फेरी जिंकली, तर पाकिस्तानने सुपर-४ फेरी जिंकली. गेल्या वर्षी टी२० विश्वचषकातच भारताचा पाकिस्तानकडून पराभव झाला होता. आता टीम इंडिया त्या पराभवाचा बदला घेण्याचा प्रयत्न करेन. पूर्व आणि दक्षिण-पूर्व ऑस्ट्रेलियामध्ये येत्या काही दिवसांत मुसळधार पाऊस अपेक्षित आहे आणि या पावसाचे सावट एमसीजीमध्ये होणारी सुपर-१२ मधील सलामीची लढत आणि मेलबर्नमध्ये भारत-पाकिस्तान सामना होऊ शकतो. हवामान खात्यानुसार, शनिवारी संध्याकाळी सिडनीमध्ये १ ते ३ मिमीसह ८०% पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र, सध्या शुक्रवारी सर्वात उष्ण दिवस असल्याचेही सांगितले जात आहे. दुपारी आणि संध्याकाळी पावसाचा सर्वाधिक अंदाज आहे. या दिवशी गतविजेता आणि यजमान ऑस्ट्रेलियाचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. इतकेच नाही तर मेलबर्नमध्ये दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी, ज्या दिवशी भारत आणि पाकिस्तान आमनेसामने येतील त्या दिवशी १० ते २५ मिमी दरम्यान पाऊस पडण्याची ९०% शक्यता आहे. २३ ऑक्टोबरच्या रविवारी चाहत्यांना किमान ५-५ षटकांचा तरी सामना होईल अशी अपेक्षा आहे, परंतु तसे न झाल्यास दोन्ही संघांना प्रत्येकी १-१ गुण दिला जाईल. कारण साखळी गटातील सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवलेला नाही. १० पेक्षा कमी षटकं झाल्यास आयोजकांनाही मोठा आर्थिक फटका बसणार आहे. आयोजकांना प्रेक्षकांना (US$4,500,000) ३७ कोटी २५ लाख २३,९५० रुपयांचे रिफंड म्हणून परत करावे लागणार आहे. त्यामुळे भारत पाकिस्तान सामना पाहण्यासाठी गेलेल्या क्रिकेटरसिकांनी छत्री, रेनकोट, डकवर्थ लुईस शीट जवळ ठेवावी.

# नामिबियाचा सात धावांनी पराभव

## श्रीकांतने जागतिक क्रमवारीत 14 व्या स्थानी

**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

टी२० विश्वचषकात सलग दुसऱ्यांदा चमत्कार करण्याचे नामिबियाचे स्वप्न भंगले. फेरी १ मधील त्यांच्या शेवटच्या गट सामन्यात, नामिबियाला (यूएई) संयुक्त अरब अमिरातीकडून अगदी जवळच्या सामन्यात ९ धावांनी पराभव पत्करावा लागला, ज्यामुळे त्यांची सुपर-१२ बनण्याची शक्यता संपुष्टात आली. यासह श्रीलंका आणि नेदरलँड्सने सुपर-१२ मध्ये आपले स्थान निश्चित केले. नामिबियाचा पराभवही भारतासाठी आनंदाची बातमी घेऊन आला आहे, कारण श्रीलंकेसारख्या बलाढ्य संघाऐवजी नेदरलँडचा संघ सुपर-१२ मध्ये भारतासोबत ग्रुप-२ मध्ये असेल. गुरूवार २० ऑक्टोबर रोजी गिलॉन्ग येथे अ गटाचे सामने झाले, ज्यामध्ये श्रीलंकेने नेदरलँड्सचा पराभव करून सुपर-१२ मध्ये आपले स्थान निश्चित केले. पण ती भारत-पाकिस्तान गटात जाणार की ऑस्ट्रेलिया-इंग्लंडसोबत याकडे डोळे लागले होते. यासाठी नामिबिया आणि यूएई यांच्यात सामना होणार होता. येथे नामिबियाच्या विजयाने त्यांना गटात पहिल्या स्थानावर नेले असते, तर येथे झालेल्या पराभवामुळे नेदरलँड दुसऱ्या स्थानावर असलेल्या सुपर-१२ मध्ये पोहोचले असते. यावेळी युएईने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नामिबियाच्या सर्वोत्तम गोलंदाजीसमोर यूएईची सुरुवात अतिशय संथ झाली आणि त्याचा परिणाम संघाच्या धावसंख्येवर झाला.




महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही